शब्दांना सत्याची धार

प्रहार

RANE PRAKASHAN PRIVATE LIMITED

मुंबई • गुरुवार, १४ मे २०२६ | मुंबई, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, नाशिक येथून एकाचवेळी प्रसिद्ध • वर्ष २२ • अंक २१५ • पाने १० • ₹ ५.००

www.prahaar.in epaper.prahaar.in

मुरुड-जंजिरा किल्ल्यावर आता 'हायटेक' जेट्टी

पान : संमिश्र

पंजाब किंग्जसाठी 'करो या मरो'!

पान : क्रीडा

वेचक

बारामती विमानतळावर पुन्हा विमान दुर्घटना

मुंबई : उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताची घटना ताजी असताना बुधवारी सकाळी बारामती विमानतळ परिसरातील गोजुबावी येथे प्रशिक्षण उड्डाण करत असलेल्या एका लहान विमानाला अपघात झाला. सुदैवाने प्रशिक्षण घेत असलेल्या पायलटच्या प्रसंगावधानामुळे मोठी दुर्घटना टळली आणि पायलट सुरक्षित बचावला. व्हीटी - आरएफवाय नोंदणी क्रमांकाचे हे प्रशिक्षण विमान सकाळी ९ ते ९.१५ वाजण्याच्या दरम्यान एकल (सोलो) उड्डाण करत होते. यावेळी विमानाच्या इंजिनमध्ये बिघाड झाल्याने आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाली. ही घटना बारामती विमानतळाच्या ११-२९ धावपट्टीच्या २९ बाजूकडील परिसरात घडली. पायलटने कौशल्याने विमानाची सुरक्षित आपत्कालीन लँडिंग केले.

पाकिस्तानस्थित शहजाद भट्टी, डोगर टोळी रडारवर

नालासोपारा : पाकिस्तानस्थित कुख्यात गँगस्टर शहजाद भट्ट टोळीशी संबंधित संशयित तरुण राज्यात सक्रिय असल्याची माहिती मिळाल्यानंतर, महाराष्ट्र एटीएसने बुधवारी मुंबईसह नालासोपारा, मीरा रोड, पुणे, नागपूर, अकोला, नांदेड तसेच नाशिक शहरात छापेमारी केली. जुन्या नाशिकमधील दूध बाजार, कोकणीपुरा, आझाद चौक आणि नानावली यांसारख्या संवेदनशील भागांत ही शोधमोहीम राबवली. तर नालासोपारा येथून एका संशयिताला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या कारवाईदरम्यान एटीएसने गुन्हेगारी रेकॉर्डवरील व्यक्तींची चौकशी केली असून त्यांच्या वर्तमान हालचाली आणि मोबाईल नेटवर्कचीही तपासणी केली.

मंत्र्यांच्या ताफ्यातील वाहनांची संख्या अर्ध्यावर

इंधन बचतीसाठी मुख्यमंत्र्यांचा निर्णय

परदेश दौरे रद्द, सरकारी विमानाचा वापर टाळण्याचे आदेश

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

जागतिक इंधन संकट आणि वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला केलेल्या काटकसरीच्या आवाहनाला प्रतिसाद देत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात प्रशासकीय खर्चाला मोठी कात्री लावली आहे. आता मुख्यमंत्र्यांसह सर्व मंत्र्यांच्या ताफ्यातील गाड्यांची संख्या निम्म्यावर आणण्याचा निर्णय घेण्यात आला असून, मंत्री आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या विनाकारण परदेश दौऱ्यांवरही बंदी घालण्यात आली आहे.

बुधवारी मंत्रालयात झालेल्या दोन उच्चस्तरीय बैठकीत मुख्यमंत्र्यांनी हा निर्णय घेतला. या निर्णयानुसार, मुख्यमंत्र्यांच्या ताफ्यातील गाड्यांसह सर्व मंत्र्यांच्या ताफ्यातील वाहनांची संख्या तत्काळ प्रभावाने अर्ध्यावर आणण्याचे आदेश देण्यात आले आहेत. जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना ताफ्यातील वाहनांची संख्या निर्धारित मर्यादेपेक्षा जास्त नसेल, याची वैयक्तिक जबाबदारी संबंधित पोलीस आयुक्त किंवा पोलीस अधीक्षकांवर सोपवण्यात आली आहे.

त्याशिवाय प्रवासाच्या खर्चावरही निर्बंध लादण्यात आले आहेत. अत्यावश्यक कामाशिवाय मंत्र्यांनी शासकीय विमान किंवा हेलिकॉप्टरचा वापर टाळून नियमित विमानसेवेचा (कमर्शियल फ्लाईट) पर्याय स्वीकारावा, असे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच, अधिकाऱ्यांना बैठकीसाठी प्रत्यक्ष मंत्रालयात न बोलावता बहुतांश बैठका व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेण्यावर भर देण्यात येणार आहे. इंधन बचतीचा संदेश सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी मंत्री आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आठवड्यातून किमान एक दिवस मेट्रो किंवा इतर सार्वजनिक वाहतुकीचा वापर करावा, असेही बैठकीत ठरवण्यात आले आहे. स्वतः मुख्यमंत्री आणि मंत्री अशा प्रकारे प्रवास करून जनतेसमोर आदर्श ठेवणार आहेत.

उपमुख्यमंत्री शिंदे यांच्याकडून 'ईव्ही'चा वापर

इंधन बचतीचा वस्तुपाठ घालून देण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वतः 'इलेक्ट्रिक वाहना'चा (ईव्ही) वापर सुरू केला आहे. अनेक मंत्र्यांनीही आता पेट्रोल-डिझेलच्या गाड्याऐवजी ई-वाहनांकडे वळण्याचे धोरण स्वीकारले आहे. यामुळे प्रशासकीय खर्चात कपात होण्यासोबतच पर्यावरणाचे रक्षण होण्यासही मदत होणार आहे

होर्डिंग्जवरील रोषणाईलाही चाप

ऊर्जा बचतीच्या मोहिमेअंतर्गत राज्यातील अनावश्यक होर्डिंग्ज आणि फ्लेक्सवर कारवाई तीव्र करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या होर्डिंग्जवर केल्या जाणाऱ्या 'डेकोरेटिव्ह लायटिंग'मुळे मोठी वीज वाया जाते, ती रोखण्यासाठी कठोर पावले उचलली जाणार आहेत. तसेच शासकीय विभागांकडे असलेल्या वाहनांचाही पुन्हा आढावा घेऊन अनावश्यक वाहने कमी केली जाणार आहेत.

रॉकेल आणि कोळसा नवा पर्याय?

जागतिक बाजारात वाढलेल्या इंधन दरांच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकार पर्यायी इंधनांच्या वितरणाचा विचार करत आहे. गरज भासल्यास एलपीजी गॅसला पर्याय म्हणून केरोसिन (रॉकेल) आणि कोळशाचा वापर करण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडून साठवणूक व वितरण व्यवस्थेची माहिती मागवण्यात आली आहे. सध्या रॉकेलचे दर ६१ रुपये प्रति लिटर असून, ही उपलब्धता टंचाईच्या काळात दिलासादायक ठरू शकते, असे संकेत मंत्री भुजबळ यांनी दिले आहेत.

पंतप्रधान मोदींच्या ताफ्यात कपात

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पेट्रोल-डिझेलचा वापर कमी करण्यासाठी स्वतःच्या अधिकृत ताफ्याचा आकार ५० टक्क्यांनी कमी करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. खर्चात कपात करण्याच्या या मोहिमेचा भाग म्हणून त्यांनी 'वर्क फ्रॉम होम' आणि आभासी बैठकांना (व्हर्च्युअल मीटिंग्ज) प्राधान्य देण्याचे आवाहनही केले आहे. विशेष म्हणजे, ताफ्यातील वाहने कमी करताना सुरक्षा नियमांशी एसपीजी प्रोटोकॉल) कोणतीही तडजोड केलेली नाही. तसेच, भविष्यात नवीन खरेदी न करता ताफ्यात इलेक्ट्रिक वाहनांचा समावेश करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या आहेत. पंतप्रधानांच्या या पावलावर पाऊल ठेवत भाजपशासित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनीही आपापल्या ताफ्यात कपात केली आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी स्वतःचा आणि मंत्र्यांचा ताफा ५० टक्क्यांनी कमी केला आहे. मुख्यमंत्री मोहन यादव यांचा ताफा १३ वरून ८ वाहनांवर आला आहे. मुख्यमंत्री भजनलाल शर्मा आणि मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनीही अनावश्यक वाहनांचा वापर टाळण्याचे निर्देश दिले आहेत. प्रशासकीय खर्चात बचत आणि पर्यावरणाचे रक्षण करण्याच्या उद्देशाने घेतलेल्या या निर्णयांचे सर्वत्र स्वागत होत आहे.

नितेश राणे देणार 'व्हीसी'वर भर

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनानंतर मंत्री नितेश राणे यांच्या मत्स्यव्यवसाय व बंदरे विभागाने खर्चात कपातीचे धोरण स्वीकारले आहे. या विभागाच्या मुंबईतील मंत्रालय किंवा इतर ठिकाणच्या सर्व बैठका आता 'व्हिडीओ कॉन्फरन्सिंग'द्वारे पार पडणार आहेत. यामुळे अधिकाऱ्यांचा प्रवास खर्च आणि इंधनाची मोठी बचत होणार असून प्रशासकीय कामाचा वेगही वाढणार आहे. तसेच, विभागात पेट्रोल-डिझेल ऐवजी इलेक्ट्रिक वाहनांच्या (ईव्ही) वापरावर भर देण्याचे निर्देश मंत्री नितेश राणे यांनी दिले आहेत.

शुभमला दोन दिवसांचे 'ट्रान्झिट वॉरंट'

नीट पेपरफुटीप्रकरणी सीबीआय मुख्यालयाकडे रवानगी

◆ नाशिक/पुणे (प्रतिनिधी) :

देशभरातील वैद्यकीय प्रवेशासाठी अनिवार्य असलेल्या 'नीट-यूजी' परीक्षेच्या पेपरफुटी प्रकरणाची व्याप्ती आता महाराष्ट्रात विस्तारली आहे. या प्रकरणी नाशिक, अहिल्यानगर आणि पुणे येथून तीन संशयितांना ताब्यात घेतले असून, या रॅकेटचे आंतरराज्य कनेक्शन समोर आले आहे.

संशयित शुभम खैरनार याला नाशिकच्या विशेष न्यायालयाने दोन दिवसांचे ट्रान्झिट वॉरंट मंजूर केले आहे. यानंतर सीबीआय पथकाने त्याला ताब्यात घेऊन पुढील तपासासाठी दिल्लीतील मुख्यालयाकडे नेले आहे.

राजस्थान पोलिसांनी नाशिक स्थानिक गुन्हे शाखेच्या मदतीने शुभमचा शोध घेतला. पोलिसांना गुंगारा देण्यासाठी त्याने स्वतःचे टक्कल केले होते आणि तो देवदर्शनाच्या बहाण्याने पसार होण्याच्या तयारीत होता. मात्र, तांत्रिक तपास आणि मोबाईल लोकेशन ट्रॅकिंगच्या आधारे पोलिसांनी त्याला इंदिरानगर परिसरातून शिताफीने अटक केली.

या प्रकरणातील दुसरा महत्त्वाचा दुवा म्हणजे धनंजय लोखंडे. तो मूळचा अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरीचा रहिवासी असून सध्या पुण्याच्या वाघोली भागात वास्तव्यास होता. सीबीआयच्या पथकाने राहुरीतील त्याच्या निवासस्थानी चौकशी केल्यानंतर त्याला ताब्यात घेतले आहे.

तसेच पुणे पोलिसांनी बुधवारी पहाटे मनीषा वाघमारे या महिलेला ताब्यात घेतले आहे. मनीषा पुण्यात ब्युटी पार्लर चालवते. तिचा धनंजय लोखंडेशी थेट संबंध असून, ती विद्यार्थ्यांना आरोपींपर्यंत पोहोचवण्याचे (एजंट म्हणून) काम करत असल्याचा संशय आहे. पोलिसांनी तिचे लॅपटॉप आणि मोबाईल जप्त केले असून, त्यातील व्हॉट्सॲप चॅट्स आणि कॉल्सवरून धक्कादायक माहिती समोर येण्याची शक्यता आहे.

फेरपरीक्षेची टांगती तलवार

नॅशनल टेस्टिंग एजन्सीने ही परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतल्याने नाशिक जिल्ह्यातील २१ केंद्रांवर परीक्षा दिलेल्या ८,८५६ विद्यार्थ्यांसह देशभरातील परीक्षार्थींना पुन्हा एकदा या परीक्षेला सामोरे जावे लागणार आहे. दोन वर्षे अहोरात्र अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये आणि पालकांमध्ये या निर्णयामुळे संतापाचे वातावरण आहे.

मतीन पटेलचे घर जमीनदोस्त

'छत्रपती संभाजीनगरमध्ये प्रशासनाची कारवाई'

नाशिक टीसीएस प्रकरणातील आरोपीला आश्रय देणे भोवले

◆ छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी):

नाशिक येथील बहुचर्चित धर्मांतर आणि टीसीएस प्रकरणातील मुख्य आरोपी निदा खान हिला आश्रय देणे 'एमआयएम'चे माजी नगरसेवक मतीन पटेल यांना चांगलेच महागात पडले आहे. प्रशासनाने कठोर पवित्रा घेत आज पहाटे मतीन पटेल यांच्या अनधिकृत घरावर बुलडोझर चालवला. या कारवाईमुळे शहरात मोठी खळबळ उडाली असून, अशा प्रवृत्तींना पाठीशी घालणाऱ्यांना प्रशासनाने इशारा दिला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारी सकाळी ६ वाजता छत्रपती संभाजीनगर महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने मोठा पोलीस ताफा घेऊन मतीन पटेल यांच्या मालमत्तांवर धडक दिली. मतीन पटेल यांनी निदा खान आणि तिच्या कुटुंबीयांना ७ दिवस ज्या घरात आश्रय दिला होता, ते घर अनधिकृत असल्याचे स्पष्ट करत पालिकेने ते पूर्णपणे जमीनदोस्त केले. या कारवाईवेळी स्थानिक नागरिकांनी प्रशासनाचे स्वागत करत फुलांची उधळण केली, तसेच आयुक्तांचे आभार मानण्याचाही प्रयत्न केला.

राजकीय सूडबुद्धीचा आरोप फोल

मतीन पटेल यांच्या वतीने ॲड. अभयसिंह भोसले यांनी हा राजकीय सूडबुद्धीचा प्रकार असल्याचे न्यायालयात सांगितले होते. "नोटीस कायदेशीर प्रक्रियेचा भंग करणारी आहे आणि ७ दिवसांचा वेळ देणे आवश्यक होते," असे मुद्दे त्यांनी मांडले. मात्र, महापालिकेतर्फे कायदेशीर बाबींची पूर्तता करण्याची हमी देण्यात आल्यानंतर न्यायालयाने हस्तक्षेप करण्यास नकार दिला.

पोलीस तपासात गंभीर ठपका

पोलीस तपासात असे निष्पन्न झाले होते की, नाशिकमधून पसार झाल्यानंतर निदा खान हिला छत्रपती संभाजीनगरमध्ये सुरक्षित आश्रय मिळवून देण्यात मतीन पटेल यांचा मोठा सहभाग होता. केवळ राहण्याची सोयच नव्हे, तर तपासापासून वाचण्यासाठी त्यांनी मदत केल्याचाही आरोप आहे. पोलिसांनी त्यांना या प्रकरणात आधीच सहआरोपी केले आहे.

इम्तियाज जलील यांच्या अटकेची मागणी : या प्रकरणाला आता तीव्र राजकीय वळण लागले आहे. पालकमंत्री संजय शिरसाट यांनी या प्रकरणी थेट एमआयएमचे माजी खासदार इम्तियाज जलील यांच्या अटकेची मागणी केली आहे. निदा खानला आश्रय देणाऱ्यांच्या पाठीशी कोण आहे, याचा सखोल तपास व्हावा, अशी आक्रमक भूमिका शिरसाट यांनी घेतली आहे.

जिहाद्यांची बाजू घेणारा इम्तियाज जलील लवकरच तुरुंगात दिसेल!

मंत्री नितेश राणे यांचा इशारा; जितेंद्र आव्हाडांच्या आंदोलनावरही बोचरी टीका

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

"राज्यात जिहादी प्रवृत्तींना थारा दिला जाणार नाही. निदा खान प्रकरणात सातत्याने जिहादची पाठराखण करणारा एमआयएमचा माजी खासदार इम्तियाज जलील हाच या प्रकरणाचा खरा मास्टरमाईंड आहे. त्यामुळे त्याची जागा बाहेर नसून जेलमध्ये आहे. येत्या काही दिवसांतच त्याच्या अटकेचा नारळ फुटेल, असा दावा राज्याचे मत्स्यव्यवसाय आणि बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांनी बुधवारी केला.

मुरुड येथे माध्यमांशी संवाद साधताना राणे यांनी विविध राजकीय आणि सामाजिक विषयांवर भाष्य करत विरोधकांचा खरपूस समाचार घेतला. निदा खान प्रकरणावर भाष्य करताना मंत्री नितेश राणे म्हणाले की, "निदा खानला ज्या घरात आश्रय देण्यात आला होता, त्या घरावर तोडक कारवाई प्रशासनाने सुरू केली आहे. हे 'देवाभाऊंचे' सरकार आहे. महाराष्ट्रात जर कोणी 'जिहाद' करण्याचा प्रयत्न करत असेल, तर त्यांच्यावर 'देवाभाऊंचा बुलडोझर' चालणार आहे."

इम्तियाज जलील यांच्या अटकेबाबत बोलताना ते म्हणाले की, मंत्री संजय शिरसाट यांनी केलेली मागणी रास्त आहे. 'महाराष्ट्र को हरा कर देंगे' अशी प्रक्षोभक भाषा वापरणाऱ्या जलील यांनी सातत्याने जिहादी मानसिकतेची बाजू घेतली आहे. त्यामुळे त्यांचा खरा चेहरा समोर येण्यासाठी त्यांची अटक आवश्यक असल्याचे राणे यांनी नमूद केले.

आंदोलन म्हणजे 'शोबाजी' : इंधनाचा वापर कमी करण्याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनावर राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) आमदार जितेंद्र आव्हाड यांनी घोड्यावर बसून आंदोलन केले होते. याविषयी विचारले असता राणे म्हणाले की, "पंतप्रधानांनी हे आवाहन कोणत्याही पक्षाचा नेता म्हणून नव्हे, तर देशाचे प्रमुख म्हणून केले होते. भविष्यात परकीय चलन साठा (फॉरेक्स) आणि कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींचे संकट लक्षात घेता हे पाऊल उचलले आहे. मात्र, यात देशहिताऐवजी राजकारण शोधणे दुर्दैवी आहे. घोड्यावरून फिरून आंदोलन करणे ही मीडियासाठीची 'शोबाजी' असून, अशा कृत्यांमुळे आव्हाड स्वतःच्या भारतीय असण्यावरच प्रश्नचिन्ह निर्माण करत आहेत."

मध्य रेल्वेची लोकल सेवा विस्कळीत

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

मध्य रेल्वेच्या लोकल व्यवस्थापकांनी नियमानुसार काम सुरू केल्याने आणि जादा काम करण्यास नकार दिल्याने, मध्य रेल्वेची लोकल सेवा कोलमडली आहे. बुधवारी सायंकाळच्या सुमारास आतापर्यंत तीन लोकल रद्द झाल्या आहेत, तर इतर लोकल प्रचंड विलंबाने धावत आहेत. तसेच संपूर्ण प्रवास कूर्मगतीने लोकल जात असल्याने प्रवाशांद्वारे संताप व्यक्त करण्यात येत आहे.

कार्यालयातून घरी प्रवास करणाऱ्या नोकरदार वर्गाला मध्य रेल्वेच्या कारभाराचा सामना करावा लागत आहे. इच्छित लोकल २० ते ३० मिनिटे उशिराने येत असल्याने, प्रवाशांचा वेळ स्थानकात उभे राहण्यास जात आहे. तसेच, लोकल उशिराने येत असल्याने, प्रत्येक स्थानकात प्रवाशांची प्रचंड गर्दी झाली आहे. भायखळा, दादर, कुर्ला, घाटकोपर, ठाणे, डोंबिवली, कल्याण या महत्त्वाच्या स्थानकात धीमी आणि जलद लोकल येत नसल्याने, प्रवासी हवालदिल झाले होते.

'वर्क टू रूल'मुळे चाकरमान्यांचे हाल

प्रवाशांचा संताप

रेल्वे प्रशासनाच्या मते, हे बदल प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी आणि मोटरमन-गार्ड यांच्यातील ताळमेळ वाढवण्यासाठी केले आहेत. मात्र, या नवीन नियमांमुळे कामाचा ताण वाढल्याचे सांगत गार्डनी जादा काम करण्यास नकार दिला. परिणामी, बुधवारी सायंकाळपर्यंत ३ लोकल रद्द कराव्या लागल्या आणि इतर गाड्या संथ गतीने धावत होत्या. मध्य रेल्वे प्रशासन आणि लोकल व्यवस्थापक यांच्यात चर्चा सुरू होती.

नवीन नियमावलीतील महत्त्वाचे बदल

- लोकल प्लॅटफॉर्म ओलांडून पुढे जाण्याच्या (प्लॅटफॉर्म ओव्हरशूटिंग) घटना टाळण्यासाठी, गाडी स्थानकात थांबण्यापूर्वी गार्डने मोटरमनला एक 'बेल बीट' देणे आता बंधनकारक आहे.
- जर मोटरमनने गार्डच्या बेलला प्रतिसाद दिला नाही किंवा गाडी स्थानकाजवळ अपेक्षेपेक्षा जास्त वेगाने येत असल्याचे आढळल्यास, गार्डला स्वतःहून 'इमर्जन्सी ब्रेक' लावून गाडी थांबवण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.
- '० बेल कोड'चा वापर करून आपत्कालीन परिस्थितीत किंवा तांत्रिक कामाच्या वेळी गाडी नियंत्रित करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

कुंभमेळा बोधचिन्हाचे दिमाखदार अनावरण

मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांची उपस्थिती; आध्यात्मिक वारसा आणि आधुनिकतेचा संगम

◆ मुंबई/नाशिक (प्रतिनिधी) :

हिंदू संस्कृतीतील सर्वोच्च श्रद्धास्थान असलेल्या नाशिक-त्र्यंबकेश्वर 'सिंहस्थ कुंभमेळा २०२६'च्या अधिकृत बोधचिन्हाचे अनावरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते बुधवारी झाले. नाशिक आणि त्र्यंबकेश्वरचा पवित्र इतिहास, प्राचीन धार्मिक परंपरा आणि आध्यात्मिक ऊर्जेचा देदीप्यमान आविष्कार या बोधचिन्हाच्या माध्यमातून जगासमोर आला आहे. सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित या सोहळ्यात विविध आखाड्यांचे पूज्य साधू-संत आणि मान्यवरांच्या उपस्थितीत या बोधचिन्हाचे अनावरण करण्यात आले.

या अद्वितीय बोधचिन्हाची निवड एका देशव्यापी डिझाइन स्पर्धेतून केली आहे. नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण, 'मायगव्ह' आणि 'असोसिएशन ऑफ डिझाइनर्स ऑफ इंडिया' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या स्पर्धेत ७० आंतरराष्ट्रीय स्पर्धकांसह एकूण ३ हजार ६७ कलाकारांनी आपल्या प्रवेशिका सादर केल्या होत्या. विशेष म्हणजे १८ ते २४ वयोगटातील तरुण पिढीने या स्पर्धेत सर्वाधिक सहभाग नोंदवून हिंदुत्वाच्या अस्मितेशी आपले नाते पुन्हा एकदा अधोरेखित केले. सहभागाच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य अग्रस्थानी राहिले असून, त्यापाठोपाठ दिल्ली आणि तामिळनाडूचा क्रमांक होता.

सोहळ्याला कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन, छगन भुजबळ, दादाजी भुसे, उदय सामंत, शिवेंद्रसिंह राजे भोसले आणि मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. आगामी कुंभमेळा हा पर्यावरणपूरक, शिस्तबद्ध आणि हिंदू धर्माच्या वैभवाला साजेसा होईल, असा संकल्प यावेळी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

पुणे येथील सुमित काटे प्रथम

नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण, 'मायगव्ह' आणि 'असोसिएशन ऑफ डिझाइनर्स ऑफ इंडिया' यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा २० नोव्हेंबर ते २० डिसेंबर २०२५ या कालावधीत घेण्यात आली होती. तज्ज्ञ समितीने निवडलेल्या तीन उत्कृष्ट स्पर्धकांचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते गौरव केला असून, यामध्ये पुण्यातील सुमित काटे यांनी प्रथम क्रमांक (३ लाख रुपये), नोएडा येथील मयांक नायक यांनी द्वितीय क्रमांक (२ लाख रुपये), तर पंढरपूर येथील पीयूष पिंपळनेरकर यांनी तृतीय क्रमांक (१ लाख रुपये) पटकावला.

बोधचिन्हाची वैशिष्ट्ये

हे बोधचिन्ह केवळ एक कलाकृती नसून ते नाशिक आणि त्र्यंबकेश्वरच्या धार्मिक परंपरेचा सार आहे.

- **भगवान शंकराचे त्रिशूळ :** हे आध्यात्मिक ऊर्जेचे प्रतीक म्हणून मध्यभागी दर्शवण्यात आले आहे.
- **त्र्यंबकेश्वर मंदिर :** प्रादेशिक वारशाचे दर्शन घडवणारी मंदिराची भव्य प्रतिकृती यात समाविष्ट आहे.
- **गोदावरी आणि शिवलिंग :** जीवनदायिनी गोदावरी नदीला 'शिवलिंग' स्वरूपात रेखाटण्यात आले असून, कुंभमेळ्यातील पवित्र शाही स्नानाचे महत्त्व यातून अधोरेखित करण्यात आले आहे.
- **काळाराम मंदिर :** नाशिकच्या ऐतिहासिक भक्ती परंपरेचा संदर्भ म्हणून काळाराम मंदिराच्या कमानीचा वापर करण्यात आला आहे.

पतसंस्था संचालक आवारेला अटक

नाशिक : भोंदू अशोक खरात प्रकरणात एसआयटी पोलिसांकडून मोठी कारवाई करण्यात आली आहे. गेल्याच आठवड्याने एसआयटीने महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांची चौकशी केली होती, तब्बल सहा तास त्यांच्याकडून घटनेची माहिती घेत तपास केला होता. त्यानंतर आता भोंदू खरातच्या प्रकरणात सिन्नर पोलिसांनी शिवनिका संस्थानचे माजी सचिव आणि जगदंबा माता पतसंस्था संचालक नामकर्ण आवारेला अटक केली आहे.

सिन्नर पोलिसांनी नामकर्ण आवारेला अटक केली असून आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात ही अटक झाल्याची माहिती आहे. सिन्नरच्या जगदंबा माता पतसंस्थेत खरातने उघडलेल्या ३२ खात्यांना आवारे याची सहमती असल्याचे तपासात निष्पन्न झाल्यानंतर ही कारवाई केली.

सोन्या-चांदीच्या आयात शुल्कात वाढ

६ टक्क्यांवरून शुल्क थेट १५ टक्क्यांवर

◆ नवी दिल्ली (प्रतिनिधी) :

जागतिक आर्थिक अनिश्चितता आणि परकीय चलन साठ्यावरील वाढता ताण लक्षात घेऊन केंद्र सरकारने सोन्यासह इतर मौल्यवान धातूंवरील आयात शुल्कात वाढ केली आहे. सरकारने आयात शुल्क ६ टक्क्यांवरून थेट १५ टक्क्यांपर्यंत वाढवले असून, या नव्या दरांची अंमलबजावणी १३ मेपासून लागू झाली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतेच नागरिकांना सोन्याची खरेदी टाळण्याचे आवाहन केले होते, त्यानंतर लगेचच हा प्रशासकीय निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे देशांतर्गत बाजारात सोन्याचे दर प्रति १० ग्रॅममागे काही हजारांनी वाढण्याची शक्यता आहे. लग्नसराईचा हंगाम असल्याने ग्राहकांना आता सोने खरेदीसाठी खिसा अधिक रिकामा करावा लागेल. तसेच, आयात शुल्क जास्त असल्याने सोन्याची तस्करी पुन्हा वाढण्याची भीतीही तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

सरकारचा मुख्य उद्देश काय ?

परकीय चलनावरील ताण : कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींमुळे डॉलरचा साठा खर्च होत आहे. सोन्याची आयात कमी करून परकीय चलन वाचवणे हा मुख्य हेतू आहे.

चालू खात्यातील तूट : देशाच्या एकूण आयातीत सोन्याचा वाटा ९% आहे. ही आयात कमी झाल्यास व्यापारी तूट नियंत्रणात राहील.

डॉलरवरील अवलंबित्व : आंतरराष्ट्रीय व्यवहारांत डॉलरचा वापर कमी करणे आणि देशांतर्गत खर्चावर नियंत्रण आणणे.